181

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# अनुसूचित जमातीच्या ६ ते १४ वर्ष वयाखालील मुलींच्या शैक्षणिक समस्या बाबतचा अहवाल

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

२००५-२००६

# अ नु क्र म णि का



| अ.क्र. | तपशील | | पृष्ठे | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १. | प्रकरण क्रमांक - १ | प्रस्तावना | ०१ | -- |
| २. | प्रकरण क्रमांक - २ | संशोधनाचा उद्देश | ०२ | -- |
| ३.. | प्रकरण क्रमांक - ३ | संशोधन अभ्यासाची पध्दत | ०३ | ०५ |
| ४. | प्रकरण क्रमांक - ४ | अनुसूचित जमातीच्या स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण | ०६ | १० |
| ५. | प्रकरण क्रमांक - ५ | मुलीच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन राबवित असलेल्या विविध योजना | ११ | १२ |
| ६. | प्रकरण क्रमांक - ६ | प्राथमिक शाळेची सुविधा | १३ | १६ |
| ७. | प्रकरण क्रमांक - ७ | अनुसूचित जमातीच्या मुलींमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यामागील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, जिवशास्त्रीय व भौगोलिक कारणांचा शोध घेण्यासाठी केलेल्या पाहणी अहवालातील निष्कर्ष | १७ | २४ |
| ८. | प्रकरण क्रमांक - ८ | अनुसूचित जमातीमधील ६ ते १४ वयोगटातील मुलींची शाळेमधील गळती | २५ | २९ |
| ९. | प्रकरण क्रमांक - ९ | सारांश | ३० | -- |
| १०. | प्रकरण क्रमांक - १० | निष्कर्ष व शिफारशी | ३१ | ३३ |
| ११. | | परिशिष्ट | ३४ | ३७ |

## प्रकरण-१
## प्रस्तावना

केंद्र शासनाचे अर्धशासकीय पत्र (इंग्रजी) क्र.१९०१३/१/०३-आर अँड पी, दिनांक २७/८/२०० अन्वये सूचित केल्याप्रमाणे ६ ते १४ वर्ष वयोगटातील अनुसूचित जमातीच्या मुलींच्या शैक्षणि समस्या व शाळा अर्धवट सोडण्यामागील कारणांचा शोध घेण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्ष संस्था या कार्यालयाने अभ्यास करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे हे संशोधन घेण्यात आले.

* * *

## संशोधनाचा उद्देश

१) १९९१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण लोकसंख्येमधील साक्षरतेचे प्रमाण ५२% इतके होते. तर अनुसूचित जमातीमधील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण २४% इतके होते. त्यामुळे २०००-२००१ या १० वर्षामध्ये अनुसूचित जमातीच्या महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाणात किती वाढ झाली व आज महिलामध्ये विशेषतः ६ ते १४ वयोगटातील मुलींमध्ये साक्षरतेची सद्यस्थिती काय आहे याचा अभ्यास करणे.

२) सन १९९१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीमध्ये महिलांचे साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यामागे विशेषतः मुलींमधील साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यामागील, अनुसूचित जमातीमधील मुलींना न शिकवण्यामागील, सामाजिक वातावरण तसेच अनुसूचित जमातीच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती इत्यादी कारणांचा अभ्यास करणे.

३) अनुसूचित जमातीमधील कुटुंबातील एकूण मुलामुलींपैकी फक्त मुलांनाच शाळेत दाखल करणे व मुलींना शाळेत दाखल न करणे यामध्ये मुलामुलींमधील लिंगभेद केला जातो काय याबाबत अभ्यास करणे.

४) अनुसूचित जमातींच्या कुटुंबानी मुलींना शाळेत पाठविण्याच्या दृष्टीने व मुलींमधील शैक्षणिक प्रगती होण्यासाठी शासनाने वेळोवेळी राबविलेल्या विविध योजनांची माहिती व त्या योजनांमुळे मुलींची झालेली शैक्षणिक प्रगतीबाबत अभ्यास करणे.

५) अनुसूचित जमातीच्या मुलींची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी स्वयंसेवी संस्थेने वेळोवेळी केलेले प्रयत्न व त्यांचे याबाबतचे योगदान याबाबत अभ्यास करणे.

६) अनुसूचित जमातीमधील सामाजिक व राजकिय कार्यकर्तांनी मुलींना शिक्षण देण्याबाबत केलेली जनजागृती व इतर केलेले प्रयत्न तसेच मुलींची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत अभ्यास करणे.

* * *

## प्रकरण-३

## संशोधन अभ्यासाची पध्दत

अनुसूचित जमातीच्या ६ ते १४ वर्ष या वयोगटातील मुलींच्या शैक्षणिक समस्या या विषयासाठी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाची निवड करण्यात आली व विभागनिहाय जी अनुसूचित जमात लोकसंख्येने जादा आहे त्यांची पुढील प्रमाणे निवड करण्यात आली.

सहयाद्री विभाग - ठाणे जिल्हयातील वाडा तालुक्यामधील वारली, ठाकर/ठाकूर, कातकरी व मल्हारकोळी या अनुसूचित जमाती.

सातपुडा विभाग- नंदूरबार जिल्हयातील नवापूर तालुक्यामधील भिल्ल, मावची, कोकणा या अनुसूचित जमाती.

गोंडवन विभाग- गडचिरोली जिल्हयातील धानोरा तालुक्यातील गोंड, परधान व धारणी जिल्हयामधील मेळघाट तालुक्यातील कोरकु अनुसूचित जमाती.

विभागनिहाय ३ गावांची निवड (१) दुर्गम भागातील गाव, (२) रस्त्यालगतचे गाव (३) या दोन भागांमधील गाव याप्रमाणे करण्यात आली.

या अभ्यासासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे प्रत्येक जमातीमधील मर्यादित कुटुंबाची निवड करण्यात आली व त्या कुटुंबाकडून ३ प्रश्नावलीद्वारे खालीलबाबीबाबत माहिती संकलीत करण्यात आली.

**प्रश्नावली क्र.२ अन्वये**

अ) (१) कुटुंबाच्या अनुसूचित जमातीचे नांव

(२) कुटुंबातील पुरुषांची / स्त्रीयांची मुलामुलींचे एकूण संख्या

(३) कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय व दुय्यम व्यवसाय

(४) कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न

(५) उपजिविकेसाठी वर्षातून किती दिवस कुटुंबासह स्थलांतरीत कालावधी

(६) पुरुष, स्त्रिया व मुला मुलींचे वय, व कोणत्या इयत्तेपर्यंत शिक्षण झाले याची माहिती

(७) शिक्षण पुढे न घेण्याची कारणे

(८) पुरुष/स्त्रियांचा सध्याचा व्यवसाय

ब) (१) गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळेची संख्या

(२) गावामध्ये प्राथमिक शाळा सुरु झालेले वर्ष

(३) गावात शाळा नसल्यास शाळा व गाव यामधील अंतर

(४) गावासाठी दळणवळणाची साधने

(५) मुलींच्या शिक्षणासाठी कोणत्या सुविधांची आवश्यकता आहे याबाबत कुटुंब प्रमुखाचे अभिप्राय

**प्रश्नावली क्र.२ अन्वये**

अ) प्रत्येक अनुसूचित जमातीमधील एक याप्रमाणे एकूण ११ राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रश्नावलीद्वारे खालीलप्रमाणे माहिती घेण्यात आली.

(१) कार्यकर्त्यांच्या कार्याचा एकूण कालावधी

(२) महिला व मुलींनामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढण्याच्या दृष्टीने त्यांनी कोणकोणते प्रयत्न केले.

(३) मुलींना न शिकवण्यामागील तसेच शाळा सोडण्याबाबतच्या कारणासंबंधी अभिप्राय

(४) मुलींच्या शाळेतील गळती थांबविण्यासाठी तसेच त्यांच्यामध्ये शैक्षणिक वाढ होण्यासाठीचे त्यांचे अभिप्राय

ब) स्वयंसेवी संस्थेमार्फत प्रश्नावलीद्वारे खालील माहिती घेण्यात आली.

(१) मुलींच्या शैक्षणिक प्रगती होण्याच्या दृष्टीने संस्थेने केले कार्य याची माहिती

(२) संस्थेने अनुसूचित जमातीच्या क्षेत्रामध्ये किती प्राथमिक / माध्यमिक शाळा सुरु केल्या आहेत.

(३) मुली मध्येच शाळा सोडण्यामागील कारणे

(४) मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढण्याच्या दृष्टीने अभिप्राय

**प्रश्नावली क्र.३ अन्वये**

अ) एकूण सात शाळा प्रमुखांकडून प्रश्नावलीद्वारे खालील माहिती घेण्यात आली.

(१) शाळेतील एकूण इयत्ता/वर्ग

(२) शाळेतील एकूण शिक्षकांची संख्या

(३) सन १९९७-९८ हे आधारभूत शैक्षणिक वर्ष मानून या वर्षात इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेतलेल्या एकूण मुलींपैकी सन २००३-२००४ या वर्षामध्ये इयत्ता ७वी पर्यंत किती शिकल्या याची माहिती.

(४) मुलींची शाळा सोडण्यामागील कारणे

(५) मुलींची शाळेतील गळती थांबविण्यासाठीचे अभिप्राय

ब) पूरक माहिती

उपसंचालक, शिक्षण विभाग यांच्याकडून खालील माहिती घेण्यात आली.

(१) आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण प्राथमिक, माध्यमिक शाळेची संख्या व त्यामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थीनींची संख्या.

(२) सन १९९२-९३ ते सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षामध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रात इयत्तावार शिकलेल्या मुला/मुलींची माहिती

(३) व्यवसायनिहाय विद्यार्थी/विद्यार्थीनीची संख्या

(४) विविध शासन निर्णय व मुलींच्या शिक्षणासाठी शासन राबवित असलेल्या योजना यांची माहिती घेतली व त्यामुळे मुलींच्या शिक्षणाच्या प्रमाणत झालेली वाढ याची माहिती घेतली.

ब) शासकीय आश्रमशाळेमध्ये गेल्या ५ वर्षी शिक्षण घेतलेल्या मुला मुलींची माहिती आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याकडून घेतली.

* * *

## प्रकरण ४

## अनुसूचित जमातीच्या स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण

अ) अनुसूचित जमातीची लोकसंख्या :

भारतीय जनगणना २००१ अन्वये देशातील एकूण लोकसंख्या १,०२८,६१०,३२८ असून यामध्ये पुरुषांची संख्या ५३२,१५६,७७२ व स्त्रियांची संख्या ४९६,४५३,५५६ इतकी आहे. देशामध्ये अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या ८४,३२६,२४० असून यामध्ये पुरुषांची संख्या ४२,६४०,८२९ व स्त्रियांची संख्या ४१,६८५,४११ इतकी आहे.

भारतीय जनगणना २००१ अन्वये महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ९६,८७८,६२७ असून यामध्ये पुरुषांची संख्या ५०,४००,५९६ व स्त्रियांची संख्या ४६,४७८,०३१ इतकी आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या ८,५७७,२७६ असून त्यामध्ये पुरुषांची संख्या ४,३४७,७५४ व स्त्रियांची संख्या ४,२२९,५२२ इतकी आहे.

भारतीय जनगणना २००१ अन्वये महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय अनुसूचित जमातीची लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | एकूण | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया |
| १. | नंदूरबार | ८५९५७४ | ४२७८५८ | ४३१७१६ |
| २. | धुळे | ४४३५६४ | २२४७२७ | २१८८३७ |
| ३. | जळगांव | ४३५९५१ | २२४०१७ | २११९३४ |
| ४. | बुलढाणा | ११५१५६ | ५९१६८ | ५५९८८ |
| ५. | अकोला | १०००८८ | ५१६०१ | ४८४८७ |
| ६. | वाशिम | ७०९८७ | ३६४३९ | ३४५४८ |
| ७. | अमरावती | ३५६५३३ | १८२२१७ | १७४३१६ |
| ८. | वर्धा | १५४४१५ | ७९६६८ | ७४७४७ |
| ९. | नागपूर | ४४४४४१ | २२८११९ | २१६३२२ |
| १०. | भंडारा | ९७७१८ | ४९०५९ | ४८६५९ |
| ११. | गोंदिया | १९६४५५ | ९७२४९ | ९९२०६ |
| १२. | गडचिरोली | ३७१६९६ | १८७०१७ | १८४६७९ |

| अ.क्र. | जिल्हा | एकूण | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|
| १३. | चंद्रपूर | ३५२५६ | १९०५५८ | १८४६९८ |
| १४. | यवतमाळ | ४७३३७० | २४१५०० | २३१८७० |
| १५. | नांदेड | २५३५९६ | १२९५१५ | १२४०८१ |
| १६. | हिंगोली | ८६८९८ | ४४७३५ | ४२१६३ |
| १७. | परभणी | ३५२१० | १७९१७ | १७२९३ |
| १८. | जालना | ३२१०३ | १६३८० | १५७२३ |
| १९. | औरंगाबाद | १००४१६ | ५१२९२ | ४९१२४ |
| २०. | नाशिक | ११९४२७१ | ६०४२७१ | ५९०००० |
| २१. | ठाणे | ११९९२९० | ६००८०९ | ५९८४८१ |
| २२. | मुंबई (बृहन) | ७०४५४ | ३७३३५ | ३३११९ |
| २३. | मुंबई | २०६६६ | ११९८७ | ९४७९ |
| २४. | रायगड | २६९१२४ | १३५८८० | १३३२४४ |
| २५. | पुणे | २६१७२२ | १३३८३५ | १२७८८७ |
| २६. | अहमदनगर | ३०३२५५ | १५३५९० | १४९६६५ |
| २७. | बीड | २४११३ | १२५५३ | ११६४० |
| २८. | लातूर | ४७८३६ | २४७८९ | २३०४७ |
| २९. | उस्मानाबाद | २७८५७ | १४४६८ | १३३८९ |
| ३०. | सोलापूर | ६८९८९ | ३५७११ | ३३२७८ |
| ३१. | सातारा | २१८९६ | ११२१८ | १०६७८ |
| ३२. | रत्नागिरी | २०१०२ | १०४१० | ९६९२ |
| ३३. | सिंधुदुर्ग | ४९५२ | २५१५ | २४३७ |
| ३४. | कोल्हापूर | २१३८७ | १०९७१ | १०४१६ |
| ३५. | सांगली | १७८५५ | ९१७६ | ८६७९ |
| | एकूण | ८५७७२७६ | ४३४७७५४ | ४२२९५२२ |

ब) भारतीय जनगणना १९९१ अन्वये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकांची जमातनिहाय लोकसंख्या खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | जमातीचे नांव | एकूण | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|
| १. | आंध | २९५३८० | १५१५४९ | १४३८३१ |
| २. | बैगा | ८८६ | ४४० | ४४६ |
| ३. | बर्डा | ९१०० | ४६२६ | ४४७४ |
| ४. | बावचा, बागचा | ४३६ | २२६ | २१० |
| ५. | भैना | १६९६ | ८३० | ८६६ |
| ६. | भारिया, भूमिया, भूईनघर, भूमिया, पांडो | २२४९ | १२२२ | १०२७ |
| ७. | भातरा | ११०२ | ५८८ | ५१४ |
| ८. | भिल, भिल गरेसिया, ढोलीभिल, डुंगरी भिल | १३४४५५४ | ६८०९२१ | ६६३६३३ |
| ९. | भूंजिया | २८०७ | १४१३ | १३९४ |
| १०. | बिंझवार | ७४७९ | ३७३१ | ३७४८ |
| ११. | बिन्हुल, बिन्होर | १००३ | ४८८ | ५१५ |
| १२. | गोधरा | ५४९ | २७७ | २७२ |
| १३. | ढाका, तडवी, टेटारिया, वळवी | ६२११० | ३०८८३ | ३१२२७ |
| १४. | धनवर | ७९०३० | ४१०४६ | ३७९८४ |
| १५. | धोडिया | १४८६६ | ७८८१ | ६९८५ |
| १६. | दुबळा, तलविया, हल्पती | २११६८ | १०९८४ | १०१८४ |
| १७. | गामित, गामता, गावित, मावची, पाडवी | १२२४०७ | ६०४२८ | ६११७९ |
| १८. | गोंड, राजगोंड, अरख, अरखा, अगारिया | १४४२९८६ | ७८१८०४ | ७१११८२ |
| १९. | हलबा, हलबी | २७८३७८ | १४२७२९ | १३५६४९ |
| २०. | कमार | ७४८९ | ३९६७ | ३५२२ |
| २१. | काथोडी कातकरी ढोर काथोडी, ढोर कातकरी, सोनका थोडी | २०२२०३ | १०३६६५ | ९८५३८ |
| २२. | कवर, कन्वर, कौर, लेखा रठीया, तन्वर, छत्री | २५५०८ | १२९६३ | १२५४५ |
| २३. | खैरवार | २६८० | १४५९ | १२२१ |
| २४. | खारिया | १२९२१ | ६६०१ | ६३२० |

| अ.क्र. | जमातीचे नांव | एकूण | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|
| २५. | कोकणा, कोकणी, कुकणा | ४६३५२५ | २३२९४८ | २३०६३७ |
| २६. | कोल | ५२२५ | २७०५ | २५२० |
| २७. | कोलाम, मन्नेरवारलु | १४७८४३ | ७५१०७ | ७२७३६ |
| २८. | कोळी ढोर, टोकरे कोळी, कोलचा, कोलघा | ११७०९१ | ६०२७३ | ५६८१८ |
| २९. | कोळी महादेव, डोंगर कोळी | ९९९३२१ | ५०९७४९ | ४८९५७२ |
| ३०. | कोळी मल्हार | २०६७४१ | १०४१३५ | १०२६०६ |
| ३१. | कोंढा, खोंढ, खोंढा | ११२२ | ७३५ | ३८७ |
| ३२. | कोरकू, बोपची, मावशी, नेहल | १४१२०२ | ७१२८७ | ६९९१५ |
| ३३. | कोया, भिनि कोया, राजकोया | ५६४ | ३२६ | २३८ |
| ३४. | नगेसिया, नगासिया | ४३६ | २२६ | २१० |
| ३५. | नाइकडा, नायका, चोळीवाला नायका, कापडीया नायका | ७२०२९ | ३७००३ | ३५०२६ |
| ३६. | ओरॉंन धनगड | ९६५२४ | ४९४९५ | ४७०२९ |
| ३७. | परधान, पाथरी, सरोटी | १२०८३६ | ६१२१९ | ५९६१७ |
| ३८. | पारधी, आडवी चिचेर, फासे पारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, बहालिया, चित्ता पारधी | १२३८१३ | ६३३५१ | ६०४६२ |
| ३९. | परजा | १७८० | ९७२ | ८०८ |
| ४०. | पटोलिया | २५४७ | १४०० | ११४७ |
| ४१. | पोयला | ५३९ | ३२१ | २१८ |
| ४२. | राठवा | १२५८ | ६३८ | ६२० |
| ४३. | सवर, सवरा | ३५७ | १९६ | १६१ |
| ४४. | ठाकुर ठाकर का-ठाकुर मा-ठाकुर मा-ठाकर का-ठाकर | ४००५८३ | २०५४२८ | १९५१५५ |
| ४५. | थोटी | ५६८ | २९१ | २७७ |
| ४६. | वारली | ४६१९१६ | २३१७२३ | २३०१९३ |
| ४७. | विटोलिया, कोटवालीया, बारोडिया | १२०३ | ६०६ | ५९७ |

## जनगणना १९९१ नुसार अनुसूचित जमातीनिहाय साक्षरतेचा प्रमाण दर्शणिारा तक्ता

| अ. क्र. | जमातीचे नांव | आदिवासी साक्षरतेचा दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण आदिवासी लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया | एकुण |
| १. | वारली | ४६११९६ | २२.२७ | ६.६१ | १४.५१ |
| २. | ठाकर/ठाकूर | ४००५८३ | ३५.६६ | १७.३६ | २६.७५ |
| ३. | कातकरी | २०२२०३ | १४.३९ | ५.५५ | १०.०८ |
| ४. | मल्हार कोळी | २०६७४१ | ३५.८६ | १३.२४ | २४.६३ |
| ५. | कोकणा | ४६३५८५ | ३९.२३ | १९.२७ | २९.३० |
| ६. | भिल्ल | १३४४५५४ | २३.३७ | ७.७६ | १५.६७ |
| ७. | गोंड | १४४२९८६ | ४७.०१ | २५.७० | ३६.५१ |
| ८. | परधान | १२०८३६ | ५६.९२ | ३२.९२ | ४५.०८ |
| ९. | कोरकू | १४१२०२ | ३१.५६ | ११.१८ | २१.४७ |
| १०. | कोळी महादेव | ११९३२१ | ४९.३७ | २५.०२ | ३७.४४ |
| ११. | कोलाम | १४७८४३ | ३४.१३ | १२.८७ | २३.६७ |
| १२. | कोळी ढोर | ११७०११ | ५६.१३ | २८.३० | ४२.६२ |
| १३. | आंध | २९५३८० | ३९.६८ | १३.०८ | २६.७३ |
| १४. | हलबा | २७८३७८ | ७२.१६ | ५१.०३ | ६१.८६ |
| १५. | दुबळा | २११६८ | ४४.०४ | २३.७३ | ३४.२७ |
| १६. | धोडिया | १४८६६ | ५४.०८ | ३७.७७ | ४६.४१ |
| १७. | धानका | ६२११० | ३५.४६ | १४.७१ | २५.०३ |
| १८. | गामित | १२२४०७ | २८.७१ | १४.४१ | २१.४७ |
| १९. | नायकडा | ७२०२९ | ४९.१७ | २१.१६ | ३५.५५ |

## मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन राबवित असलेल्या विविध योजना

**) प्राथमिक शाळेतील मुलींना उपस्थिती भत्ता :**

शाळेत जाणाऱ्या मुलींच्या उपस्थितीमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने व तयाच्यातील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व त्या क्षेत्राबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती व भटक्या मधील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुलींकरीता इयत्ता ली ते ४ थी मधील मुलींना प्रतिदिन एक रुपया दराने उपस्थिती भत्ता सन १९९२ पासून देण्यात येतो.

**) अदिवासी मुलीं मधील गळती थांबविण्यासाठी प्रोत्साहन भत्ता :**

इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी या वर्गात शिकत असलेल्या आदिवासी मुलींमधील गळती थांबविण्यासाठी सन २००३-२००४ पासून खालीलप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो.

(अ) इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंत वर्षात ६०% उपस्थिती असल्यास आदिवासी मुलींना दरमहा रु.५०/-

(ब) इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत वर्षात ७०% उपस्थिती असल्यास दरमहा रु.१००/-

**३) इयत्ता ५ वी ते ७ वी मधील मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती :**

मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेत इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकत असलेल्या अनु.जाती अनु.जमाती विभाजन व विभाग वर्ग मधील मागासवर्गीय मुलींचे गळतीचे प्रमाण कमी होणेसाठी इयत्ता ५ वी ते ७ वी प्रत्येकी दरमहा रुपये ३०/- प्रमाणे रु.३००/- एका शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. यासाठी वय व उत्पन्नाची अट नाही.

**४) अहिल्याबाई होळकर योजना :**

सन १९९६-९७ या आर्थिक वर्षापासून अहिल्याबाई होळकर योजने अंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १० वी मधील मुलींना त्यांच्या गावात माध्यमिक शाळेत जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत एकूण खर्चापैकी १/३ खर्च राज्य शासनाकडून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास देण्यात येतो.

**५) प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनीसाठी पोषण आहार :**

प्राथमिक शाळेच्या स्तरावरील मुलामुलींच्या उपस्थितीमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सन १९९५-९६ या वर्षापासून पोषण आहार ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील शासकीय व शासकीय अनुदानित शाळेतील इयत्ता १ ली ते ५ वी मधील दरमहा किमान ८०% उपस्थिती असणाऱ्या मुलामुलींना दरमहा ३ किलो तांदूळ पोषण अहार म्हणून

दिला जातो. ज्या शाळेत शिजवलेले अन्न पुरविण्याची सोय आहे त्या शाळेत दर दिवशी शिजवलेले अन्न पोषण आहार म्हणून देण्यात येते.

६) **शासकीय आश्रमशाळा :**

अनुसूचित जमातीमधील मुलामुलींची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी शासनाने सन १९७२ पासून आदिवासी भागात शासकीय आश्रमशाळा सुरु केल्या आहेत. या शाळेत प्रवेश घेणाऱ्या सर्व मुला/मुलींना मोफत राहण्याची जेवणाची व्यवस्था पूरविण्यात येते. तसेच गणवेश क्रमिक पुस्तके वहया लेखन साहित्य इ.मोफत पुरविण्यात येते.

७) **वसतीगृह :**

आदिवासी विद्यार्थी / विद्यार्थीनी यांना निवासी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तालुका जिल्हा व विभागीय स्तरावर एकूण २९४ वसतीगृह आहेत या पैकी १४४ वसतिगृह ही केवळ मुलींसाठी आहेत. वसतिगृहात राहण्याची व जेवणाची सुविधा विनामुल्य असते. तसेच पाठयपुस्तके, संदर्भ पुस्तके, गणवेश मोफत पुरविण्यात येते.

८) अनुसूचित जमातीच्या मुलींसाठी प्रकल्पनिहाय स्वतंत्र माध्यमिक कन्या शाळा सुरु केल्या आहेत. महाराष्ट्रात एकूण २३ कन्याशाळा सुरु आहेत.

## प्राथमिक शाळेची सुविधा

राज्यातील मुला मुलींची शैक्षणिक प्रगती होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन ग्रामीण भागात जिल्हा परिषदेमार्फत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देत आहे. सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषदे मार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळेची संख्या व विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जिल्हा | प्राथमिक शाळांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| १. | नाशिक | २६९७ | १७८१७१ | १६५५६३ | ३४३७३४ |
| २. | धुळे | ९५० | ५९२५४ | ५७८८८ | ११७१४२ |
| ३. | नंदूरबार | ११४२ | ५२५४१ | ४९६६५ | १०२२०६ |
| ४. | जळगांव | १६४४ | १४३०९५ | १३५५८९ | २७८४८४ |
| ५. | ठाणे | २८१४ | १३०२६२ | १२०७४५ | २५१००७ |
| ६. | पुणे | ३२९० | १६६२२० | १५८६०४ | ३२४८२४ |
| ७. | अहमदनगर | २८५५ | १९५४९४ | १८६२४९ | ३८१७४४ |
| ८. | सोलापूर | २३४५ | १६२४९७ | १५४३१९ | ३१६८१६ |
| ९. | रायगड | २५४४ | १११४९७ | १०८६८२ | २२०१७९ |
| १०. | कोल्हापूर | १७०८ | १४३०६८ | १३४६२२ | २७७६९० |
| ११. | रत्नागिरी | २५८१ | ९६९९१ | ९४५७० | १९१५६१ |
| १२. | सिंधुदुर्ग | १४३२ | ४३९१० | ४३०२४ | ८६९३४ |
| १३. | सातारा | २३८४ | १३१२३९ | १२७२०५ | २५८४४२ |
| १४. | सांगली | १५२६ | ११३२३२ | १०५६६४ | २१८८९६ |
| १५. | औरंगाबाद | १४०३ | १५४७६२ | १४१०८१ | २९५८४३ |
| १६. | जालना | ११६१ | ११०६६६ | १०४०६८ | २१४७३४ |
| १७. | परभणी | ९८८ | ८७६२२ | ८४१९२ | १७१८१४ |
| १८. | हिंगोली | ७३१ | ६७१७७ | ६२५४० | १२९७१७ |
| १९. | बीड | १७८९ | १३०१३१ | १२६१४३ | २५६२७४ |

| अ.क्र. | जिल्हा | प्राथमिक शाळांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| २०. | नांदेड | १८४३ | १४६१९१ | १४६२५६ | २९२४४७ |
| २१. | उस्मानाबाद | ८९२ | ८३३८० | ८०५९२ | १६३९७३ |
| २२. | लातूर | ११०३ | ११३२३१ | ११४८४० | २२७६७१ |
| २३. | अमरावती | १५४९ | १११८६८ | १०४८३१ | २१६६९९ |
| २४. | बुलढाणा | १२८६ | १२००३६ | ११२७०३ | २३२७३९ |
| २५. | अकोला | ८६८ | ७३६६० | ६७५७८ | १४१२३८ |
| २६. | वाशिम | ७३७ | ५९४८५ | ५५७७९ | ११५२६४ |
| २७. | यवतमाळ | १८२२ | १४२५४८ | १३७१६५ | २७९७१३ |
| २८. | नागपूर | १५२२ | ९३०८४ | ८५४३९ | १७८५२३ |
| २९. | वर्धा | ८९५ | ४६७४६ | ४४१०१ | ९०८४७ |
| ३०. | भंडारा | ७२२ | ४९२०६ | ४८७६२ | ९७९६८ |
| ३१. | गोंदिया | ९२३ | ६५८३४ | ६५१४४ | १३०९७८ |
| ३२. | चंद्रपूर | १४९६ | ९४१२४ | ९२३६३ | १८६४८७ |
| ३३. | गडचिरोली | १२६५ | ५०२७६ | ४९०७९ | ९९३५५ |
| **३४.** | **महाराष्ट्र राज्य** | **५२८१७** | **३५२७४९८** | **३३६४४४३** | **६८९१९४१** |

## आश्रमशाळा योजना

अनुसूचित जमातीमधील मुला मुलींची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी आदिवासींच्या क्षेत्रात आश्रमशाळा ही योजना सन १९७३ पासून राबविण्यात येत आहे. या शाळेत मुला मुलींची राहण्याची जेवणाची मोफत सोय करण्यात येते. त्याचप्रमाणे वहया पुस्तके व गणवेश इ.सुविधा मोफत पुरविण्यात येतात. सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षामध्ये घेतलेल्या मुलींची संख्या खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | आश्रमशाळेची संख्या | पो.बे.आ. शाळेची संख्या | एकूण | मुलींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | २२ | ४३ | ६५ | ८००६ |
| २. | रायगड | २ | ६ | ८ | ९११ |

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | आश्रमशाळेची संख्या | पो.बे.आ. शाळेची संख्या | एकूण | मुलींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ३. | नाशिक | ६४ | ४४ | १०८ | ११२७१ |
| ४. | नंदूरबार | ७० | ३९ | १०९ | १०४०३ |
| ५. | जळगांव | १५ | १२ | २७ | ११८८ |
| ६. | अहमदनगर | १७ | १० | २७ | २३५७ |
| ७. | पुणे | ३ | १२ | १५ | ३७६५ |
| ८. | सोलापूर | २ | ० | २ | २३२ |
| ९. | औरंगाबाद | १ | ३ | ४ | ३५१ |
| १०. | परभणी | २ | ३ | ५ | ८९२ |
| ११. | नांदेड | ३ | ११ | १४ | २०३९ |
| १२. | बुलढाणा | २ | १ | ३ | ४४६ |
| १३. | नागपूर | ४ | ३ | ७ | ८४२ |
| १४. | सातारा | २ | ० | २ | ३३४ |
| १५. | कोल्हापूर | १ | १ | २ | २७८ |
| १६. | अमरावती | ७ | ९ | १६ | १९०१ |
| १७. | अकोला | १ | १ | २ | ३२३ |
| १८. | यवतमाळ | ८ | १७ | २५ | ४१८४ |
| १९. | वर्धा | ३ | २ | ५ | ६८४ |
| २०. | चंद्रपूर | १० | ११ | २१ | २६७७ |
| २१. | बीड | १ | १ | २ | ११८ |
| २२. | रत्नागिरी | १ | १ | २ | २१९ |
| २३. | भंडारा | ११ | ७ | १८ | २१६८ |
| २४. | गडचिरोली | ७ | ३२ | ३९ | ५३११ |
| | एकूण | २५९ | २६९ | ५२८ | ६०१७८ |

अनुसूचित जमातीच्या मुला मुलींसाठी आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांची माहिती.

| अ.क्र. | अपर आयुक्त कार्यालयाचे नांव | प्रकल्प कार्यालयाचे नांव | एकूण शाळा (अनुदानित आश्रमशाळा) |
|---|---|---|---|
| १. | नाशिक | नाशिक | ३१ |
| २. | | कळवण | ४० |
| ३. | | नंदूरबार | ५६ |
| ४. | | तळोदा | २६ |
| ५. | | यावल | २८ |
| ६. | | राजूर | १४ |
| ७. | ठाणे | जव्हार | १६ |
| ८. | | डहाणू | २१ |
| ९. | | शहापूर | १३ |
| १०. | | पेण | १२ |
| ११. | | घोडेगांव | ९ |
| १२. | अमरावती | औरंगाबाद | ८ |
| १३. | | धारणी | २८ |
| १४. | | पांढरकवडा | ४२ |
| १५. | | किनवट | २८ |
| १६. | | अकोला | १७ |
| १७. | नागपूर | नागपूर | २७ |
| १८. | | देवरी | ३५ |
| १९. | | चंद्रपूर | २८ |
| २०. | | चिमूर | १२ |
| २१. | | अहेरी | १४ |
| २२. | | भामरागड | १६ |
| २३. | | गडचिरोली | २१ |
| | एकूण | | ५१३ |

## प्रकरण क्र. - ७

## अनुसूचित जमातीच्या मुलींमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यामागील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, जिवशास्त्रीय व भौगोलिक कारणांचा शोध घेण्यासाठी केलेल्या पाहणी अहवालातील निष्कर्ष

अनुसूचित जमातीच्या मुलींमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यामागील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, जिवशास्त्रीय व भौगोलिक कारणांचा शोध घेण्यासाठी संशोधन पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. सदर संशोधन पथकामध्ये खालीलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी वृंदाची नियुक्ती करण्यात आली.

(१) श्री.व्ही.बी.कांबळे, संशोधन अधिकारी

(२) श्री.व्ही.एन.डगळे, सांख्यिकी सहाय्यक

(३) श्री.डी.ए.कसबे, सांख्यिकी सहाय्यक

(अ) सदर पथकाने महाराष्ट्र राज्यामधील एकूण ४५ अनुसूचित जमातीपैकी ज्या जमाती लोकसंख्येच्या दृष्टीने जास्त आहेत अशा एकूण ११ मुख्य अनुसूचित जमातींची विभागनिहाय खालीलप्रमाणे निवड केलेली आहे.

(१) सहयाद्री विभाग :

ठाणे जिल्हातील वाडा, शहापूर, जव्हार, मोखाडा व विक्रमगड या तालुक्यातील वारली, ठाकर/ठाकूर, कातकरी व मल्हार कोळी.

नाशिक जिल्हयातील कळवण, सुरगाणा, पेठ या तालुक्यातील रायगड जिल्हयातील पेण तालुक्यातील ठाकर व कातकरी.

(२) सातपुडा विभाग :

नंदूरबार जिल्हयातील नवापूर तालुक्यातील मावची, भिल्ल व कोकणा.

(३) गोंडवन विभाग :

गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यातील माडीया, धानोरा तालुक्यातील गोंड व परधान व अमरावती जिल्हयातील मेळघाट तालुक्यातील कोरकु.

(ब) संशोधन पथकाने केलेली कामे

अनुसूचित जमातीच्या मुलींमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यामागील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, जिवशास्त्रीय व भौगोलिक कारणांचा शोध घेण्यासाठी ३ प्रकारच्या प्रश्नावली तयार करण्यात आल्या.

(१) कुटुंब पत्रकाद्वारे खालीलप्रमाणे माहिती घेण्यात आली.

(२) कुटुंबाच्या अनुसूचित जमातीचे नांव

(३) कुटुंबातील पुरुषांची, स्त्रियांची व मुला मुलींची एकूण संख्या

(४) कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय व दुय्यम व्यवसाय

(५) कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न

(६) उपजिविकेसाठी वर्षातून कुटुंबाचा स्थलांतरीत होण्याचा कालावधी

(७) मुला मुलींचे वय, इयत्तानिहाय शिक्षण

(८) शिक्षण अर्धवट सोडण्याची कारणे

(९) गावातील शैक्षणिक सुविधा

(१०) गावात शाळा नसल्यास शाळा व गांव यामधील अंतर

जिल्हानिहाय, तालुकानिहाय खालीलप्रमाणे कुटुंबपत्रके भरुन घेतली.

(१) नंदूरबार जिल्हयातील : नवापूर तालुक्यातील उकळापाणी व बोरसर या गावातून मावची या जमातीमधील २८ कुटुंबपत्रके व दुधवे, जामदा या गावातून भिल्ल या अनुसूचित जमातीची एकूण ४९ कुटुंबपत्रके भरुन घेतली.

(२) नाशिक जिल्हयातील : सुरगाणा तालुकयातील हिरडपाडा गावातून कोकणा या अनुसूचि जमातीमधील एकूण ४० कुटुंबपत्रके भरुन घेतली.

(३) ठाणे जिल्हयातील : वाडा तालुक्यातील पाचघर या गावाला भेट देऊन वारली या अनुसूचित जमातीची एकूण १५ कुटुंबपत्रके भरुन घेतली. विक्रमगड तालुक्यातील वेहेलपाडा या गावातून मल्हार कोळी या अनुसूचित जमातीच्या एकूण १५ कुटुंबाकडून कुटुंबपत्रके भरुन घेतली.

(४) मोखाडा तालुक्यातील पोशेरे या गावातून कातकरी कुटुंबाकडून एकूण १७ कुटुंबपत्रके भरुन घेतली. तसेच वाडा तालुक्यातील परळी गावातून व शहापूर तालुक्यातील खरडी या गावातून व रायगड जिल्हयातील पेण तालुक्यातील लागाचीवाडी येथून कातकरी जमातीच्या प्रत्येकी २ कुटुंबाकडून कुटुंबपत्रके भरुन घेतली. शहापूर तालुक्यातील वडाचा पाडा या गावातून ठाकर/ठाकूर या अनुसूचित जमातीच्या एकूण १२ कुटुंबाकडून व रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यातील नागेवाडी या गावातून ३ कुटुंबांकडून कुटुंबपत्रके भरुन घेतली.

५) एकूण सात शाळा प्रमुखांकडून प्रश्नावली क्र.३ द्वारे खालील माहिती घेण्यात आली.

(१) शाळेतील एकूण इयत्ता/वर्ग

(२) शाळेतील एकूण शिक्षकांची संख्या

(३) सन १९९७-९८ हे आधारभूत शैक्षणिक वर्ष मानून या वर्षात इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेतलेल्या एकूण मुलींपैकी सन २००३-०४ वर्षामध्ये इयत्ता ७ वी पर्यंत किती मुली शिकल्या याची माहिती

(४) मुलींची शाळेतील गळती थांबविण्यासाठीचे अभिप्राय

६) उपसंचालक शिक्षण विभाग यांच्याकडून खालील माहिती घेण्यात आली.

(१) सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या एकूण प्राथमिक माध्यमिक शाळेची संख्या व त्यामध्ये शिकत असलेल्या मुला मुलींची संख्या

(२) सन १९९२-९३ ते सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षामध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रात वर्षनिहायय इयत्तावार शिकलेल्या मुला मुलींची माहिती.

(३) मुलींच्या शिक्षणासाठी शासन राबवित असलेल्या विविध योजनांचे शासन निर्णय

७) आयुक्त आदिवासी विकास विभाग यांच्याकडून शासकीय आश्रमशाळेत गेल्या ५ वर्षात शिक्षण घेतलेल्या मुला मुलींची माहिती घेतली.

## अनुसूचित जमातीमधील मुलींची शैक्षणिक स्थिती

सन १९९६-९७ मध्ये केलेल्या बेंच मार्क सर्वेक्षण अंतर्गत राज्यातील एकूण २२ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामधील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावे, शहरे व पाडे मिळून ६३४५८० कुटुंबपत्रके भरुन घेतली. सदर कुटुंब पत्रकान्वये ६ ते १४ वयोगटातील एकूण मुलींची संख्या ३२०२८७ इतकी असून त्यापैकी शाळेत जाणाऱ्या मुलींची संख्या २३१३८६ व शाळेत न जाणाऱ्या मुलींची संख्या ८७९०१ इतकी आहे.

आदिवासी मुलींमध्ये शैक्षणिक प्रगती कमी असण्या मागील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, भौगोलिक व जिवशास्त्रीय कारणांचा शोध घेण्यासाठी केलेल्या पाहणीमधील जमातीनिहाय ६ वर्ष वयावरील मुलींची शैक्षणिक स्थिती खालीलप्रमाणे.

### तक्ता क्र.१

| अ. क्र. | अनुसूचित जमातीचे नांव | एकूण कुटुंब संख्या | कुटुंबातील एकूण मुली | कुटुंबातील मुली निरक्षर | कुटुंबातील मुली साक्षर | साक्षर मुलींची इयत्तानिहाय स्थिती १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | पदवीधर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मावची | २८ | २५ | ० | २५ | ५ | ३ | २ | ३ | १ | १ | ४ | १ | १ | ३ | १ | ० | ० | २५ |
| २ | ठाकर/ठाकूर | १६ | ३१ | ३ | २८ | ४ | ५ | ३ | १ | ९ | ३ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २८ |
| ३ | वारली | १५ | ३१ | २ | २९ | ८ | १ | २ | ८ | ७ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २९ |
| ४ | कातकरी | २५ | ३७ | ५ | ३२ | ९ | ५ | ८ | ६ | १ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३२ |
| ५ | मल्हार कोळी | १५ | २६ | ४ | २२ | ६ | २ | १ | ३ | १ | ० | ८ | ० | १ | ० | ० | ० | ० | २२ |
| ६ | कोकणा | ३० | २७ | १ | २६ | ७ | ० | २ | ६ | ३ | ३ | २ | २ | १ | ० | ० | ० | ० | २६ |
| ७ | भिल्ल | ४१ | ५८ | ० | ५८ | १४ | ६ | ५ | १० | ७ | ३ | | ३ | ० | ६ | ० | १ | १ | ५८ |
| ८ | माडिया | २० | २८ | ६ | २२ | ० | २ | ० | १ | ३ | ३ | २ | ४ | २ | १ | ० | ३ | १ | २२ |
| ९ | गोंड | १४ | १४ | ० | १४ | १ | १ | १ | १ | ० | ० | १ | ५ | १ | १ | २ | ० | ० | १४ |
| १० | परधान | ३० | १९ | ० | १९ | ६ | ० | १ | ० | १ | ० | २ | १ | २ | ६ | ० | ० | ० | १९ |
| ११ | कोरकू | २५ | ४१ | ० | ४१ | ४ | २ | ३ | ५ | ५ | ३ | ४ | ७ | ४ | २ | १ | १ | ० | ४१ |
| १२ | एकूण | २६७ | ३३७ | २१ | ३१६ | ६४ | २७ | २८ | ४४ | ३८ | २० | २९ | २४ | १२ | १९ | ४ | ५ | २ | ३१६ |

पाहणीमध्ये एकूण २६७ कुटुंबाकडून कुटुंबपत्रके भरुन घेतली. या कुटुंबात एकूण मुलींची संख्या ३३७ आहे. त्यापैकी फक्त २१ मुली शाळेत न जाणाऱ्या आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ६२३ आहे. यामध्ये प्रामुख्याने आदिम जमातीमधील कातकरी जमातीमधील ५ मुली व माडिया गोंड मधील ६ मुली यांची संख्या जास्त आहे.

## अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची आर्थिक स्थिती

महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ४५ अनुसूचित जमाती असून या जमातींच्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती व शेतमजुरी हा आहे अपवाद फक्त ठाकर, कातकरी व पारधी या जमाती असून यांना शेती नसून ते इतर व्यवसाय करतात. कार्यालयाने सन १९९६-९७ मध्ये केलेल्या बेंच मार्क सर्वेक्षणानुसार अनुसूचित जमातीमधील शेती असलेल्या कुटुंबांची संख्या व शेती नसलेल्या कुटुंबांची जमातीनिहाय संख्या खालीलप्रमाणे :-

### अनुसूचित जमातीनिहाय भूधारक व भूमीहीन कुटुंबांची संख्या खालीलप्रमाणे

### तक्ता क्र.२

| अ.क्र. | अनुसूचित जमातीचे नांव | एकूण कुटुंबाची संख्या | भूमीहीन | भूधारक | भूमीहीन कुटुंबांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मावची | १९००३ | ७७४८ | ११२५५ | ४०.७७ |
| २ | ठाकर | ३३५६३ | १५४१२ | १८१५१ | ४५.९२ |
| ३ | वारली | ७०१४३ | २७०६५ | ४३०७८ | ३८.५९ |
| ४ | कातकरी | १४८६२ | १२३५२ | २५१० | ८३.११ |
| ५ | मल्हार कोळी | २४२७५ | १०७४८ | १३५२७ | ४४.२८ |
| ६ | कोकणा | ७१३२६ | १४९९१ | ५६३३५ | २१.०२ |
| ७ | भिल्ल | १३१९४७ | ७६१६६ | ५५७८१ | ५७.७२ |
| ८ | माडिया गोंड | १३३५१ | २३३३ | १०९८ | १७.४७ |
| ९ | गोंड | ९२७९६ | ३८३९७ | ५४३९९ | ४१.३८ |
| १० | परधान | ९७७२ | ५८९३ | ३८७९ | ६०.३० |
| ११ | कोरकु | २५०४० | १०६३६ | १४४०४ | ४२.४८ |

आधार : बेंच मार्क सर्वे १९९६.

अनुसूचित जमातीच्या लोकांची शेती ही प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे शेतीचे उत्पन्न फार कमी आहे. त्यामुळे त्यांना उदरनिर्वाहासाठी इतर व्यवसाय करावा लागतो. अनुसूचित जमातीनिहाय उत्पन्नाची स्थिती खालीलप्रमाणे :-

तक्ता क्र.३

| अ. क्र. | जमातीचे नांव | कुटुंबांची संख्या | ११००० पर्यंत | ११००० ते २०००० पर्यंत | २०००० चे वर | दारिद्रय रेषेखाली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंध | २६७४५ | २४३०० | १७९० | ६५५ | ९०.८६ |
| २ | ठाकूर/ठाकर | ३३५६३ | ३०१२१ | २२२८ | १२१४ | ८९.७४ |
| ३ | वारली | ७०१४३ | ६५०७२ | ३४९९ | १५७२ | ९२.७७ |
| ४ | कातकरी | १४८६२ | १४४३७ | ३३७ | ८८ | ९७.१४ |
| ५ | मल्हार कोळी | २४२७५ | २२३३५ | १११४ | ८२६ | ९२.०१ |
| ६ | कोकणा | ७१३२६ | ६१७५८ | ६२०५ | ३३६३ | ८६.५९ |
| ७ | भिल्ल | १३१९४७ | १२४५७० | ५०१४ | २३६३ | ९४.४१ |
| ८ | कोरकू | २४०४० | २२०८४ | १२६६ | ६९० | ८८.१९ |
| ९ | कोलाम | १४१८२ | १३१५१ | ८४० | १९१ | ९२.७३ |
| १० | मावची | १९००३ | १७१३४ | १२६६ | ६०३ | ९०.१६ |
| ११ | महादेव कोळी | ६४१३० | ५५९५२ | ५२५१ | २९२७ | ८७.२५ |

अनुसूचित जमातीच्या मुलीमधील साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामागील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, भौगोलिक व जिवशास्त्रीय कारणांचा शोध घेण्यासाठी केलेल्या पाहणी अहवालामध्ये जमातीनिहाय आर्थिक स्थिती खालीलप्रमाणे :-

तक्ता क्र.४

| अ. क्र. | जमातीचे नांव | उत्पन्न गट (स्तर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दारिद्रय रेषेखालील १५००० पर्यंत | दारिद्रय रेषेवरील १५००० ते २०००० पर्यंत | २०००० चे पुढे | एकूण |
| १ | मावची | १९ | ३ | ६ | २८ |
| २ | ठाकर | १० | ३ | ३ | १६ |
| ३ | वारली | १२ | ३ | ० | १५ |
| ४ | कातकरी | २२ | २ | १ | २५ |
| ५ | मल्हार कोळी | १० | १ | ४ | १५ |

| अ. क्र. | जमातीचे नांव | उत्पन्न गट (स्तर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दारिद्र्य रेषेखालील १५००० पर्यंत | दारिद्र्य रेषेवरील १५००० ते २०००० पर्यंत | २०००० चे पुढे | एकूण |
| ६ | कोकणा | २९ | १ | ० | ३० |
| ७ | भिल्ल | ४८ | १ | ० | ४९ |
| ८ | माडिया गोंड | १२ | ८ | ० | २० |
| ९ | गोंड | १४ | ० | ० | १४ |
| १० | परधान | २९ | १ | ० | ३० |
| ११ | कोरकू | २४ | ० | १ | २५ |
| | एकूण | २२९ | २३ | १५ | २६७ |

एकूण २६७ कुटुंबांपैकी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या २२९ इतकी आहे. दारिद्र्य रेषेवरील ते रु.२०,०००/-पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या २३ आहे. व रु.२०,०००/- पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या १५ आहे. उत्पन्न कमी असल्या कारणाने अनुसूचित जमातीमधील कुटुंबे स्थलांतरीत होतात. राज्याच्या सिमेलगतच्या तालुक्यातील अनुसूचित जमातीचे लोक रोजगारासाठी शेजारील राज्यात मुलांसह कुटुंबांचे स्थलांतर करतात. अक्राणी, नवापूर, अक्कलकुवा येथील भिल्ल व मावची मध्य प्रदेश व गुजरात राज्यात स्थलांतरीत होतात. तसेच पेठ, सुरगाणा, जव्हार, मोखाडा व डहाणू या तालुक्यातील कोकणा, टोकरे कोळी, वारली, कातकरी व मल्हार कोळी या जमातीचे लोक गुजरात राज्यात स्थलांतरीत होतात.

अमरावती जिल्हयातील मेळघाट तालुक्यातील कोरकु व परधान जमातीचे लोक मध्य प्रदेशात स्थलांतरीत होतात. सन १९९६-९७ मध्ये झालेल्या बेंच मार्क सर्वेक्षणानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जमातीनिहाय स्थलंतरीत होणाऱ्या कुटुंबांचीसंख्या खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.५**

| अ.क्र. | जमातीचे नांव | एकूण लोकसंख्या | स्थलांतरीत कुटुंब संख्या |
|---|---|---|---|
| १ | आंध | २६७४५ | ८६२३ |
| २ | ठाकूर/ठाकर | ३३५६३ | ७१६१ |
| ३ | वारली | ७०१४३ | २४३११ |
| ४ | कातकरी | १४८६२ | ७४४२ |
| ५ | मल्हार कोळी | २४२७५ | ३७१० |

| अ.क्र. | जमातीचे नांव | एकूण लोकसंख्या | स्थलांतरीत कुटुंब संख्या |
|---|---|---|---|
| ६ | कोकणा | ७१३२६ | २०८८१ |
| ७ | भिल्ल | १३१९४७ | २३६३६ |
| ८ | मावची | ११००३ | ४३३१ |
| ९ | कोलाम | १४१८२ | १७२७ |
| १० | कोरकू | २४०४० | १८०६ |
| ११ | महादेव कोळी | २४२७५ | ३७१० |

* * *

# प्रकरण क्र.८

## अनुसूचित जमातीमधील ६ ते १४ वयोगटातील मुलींची शाळेमधील गळती

अनुसूचित जमातीमधील ६ ते १४ वर्षे या वयोगटातील मुलींची प्राथमिक शाळेच्या स्तरावर फार मोठ्या प्रमाणात गळती होत असते. सन १९९१-९२ ते सन १९९३-९४ या कालावधीमध्ये वर्षनिहाय इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेतलेल्या मुलींची संख्या व त्यापैकी इयत्ता ८ वी मध्ये गेलेल्या मुलींची संख्या व गळतीचे प्रमाण खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.६**

| वर्ष | इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेतलेल्या मुलींची संख्या | वर्ष | इयत्ता ८ वीमध्ये गेलेल्या मुलींची संख्या | गळलेल्या मुलींची संख्या | गळतीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १९९१-९२ | १२७६९२ | १९९८-१९९९ | ३९४१५ | ८८२७७ | ३०.८७ |
| १९९२-९३ | १३५९७८ | १९९९-२००० | ४२५१८ | ९३४६० | ३१.९७ |
| १९९३-९४ | १४३८५५ | २०००-२००१ | ४७४५७ | ९६३९८ | ३२.४९ |

नमुना पाहणीमध्ये ज्या गावांना भेटी देऊन कुटुंब पत्रके भरुन घेतली त्या अन्वये मुलींची जमातीनिहाय व इयत्ता निहाय गळती खालीलप्रमाणे :-

**तक्ता क्र.७**

| अ. क्र. | अनुसूचित जमातीचे नांव | गावाचे नाव व तालुका | ६ ते १४ वयोगटातील मुलींची संख्या | इयत्ता | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण |
| १ | मावची | उकलापाणी ता.नवापूर | ११ | ० | ० | ० | ३ | ० | ० | ४ | ० | ७ |
| | | बोरझर, ता.नवापूर | ७ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | ठाकर | वडाचा पाडा, ता.शहापूर | १७ | २ | १ | २ | ० | ५ | ० | ० | ० | १० |
| | | भोरकस, ता.पेण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | नागेवाडी, ता.कर्जत | ६ | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| ३ | वारली | पाचघर, ता.वाडा | २३ | ० | ० | १ | ७ | ६ | १ | ० | ० | १५ |
| ४ | कातकरी | खर्डी, ता.शहापूर | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| | | पोशेरे, ता.मोखाडा | २० | ६ | ३ | ७ | १ | ० | ० | ० | ० | १७ |
| | | परळी, ता.वाडा | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |

| अ. क्र. | अनुसूचित जमातीचे नांव | गावाचे नाव व तालुका | ६ ते १४ वयोगटातील मुलींची संख्या | इयत्ता | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण |
| | कातकरी | शितोळावाडी. ता.पेण | २ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | २ |
| | | तागाचीवाडी, ता.पेण | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | मल्हार कोळी | वेहेलपाडा, ता.विक्रमगड | १३ | ४ | ० | १ | ० | ० | ० | २ | ० | ७ |
| | | विठ्ठलपाडा, ता.विक्रमगड | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| ६ | कोकणा | हिरडपाडा, ता.सुरगाणा | १९ | २ | ० | ० | ४ | २ | ० | १ | ० | ९ |
| ७ | भिल्ल | दुधवे, ता.नवापूर | २० | ३ | ० | १ | २ | ० | १ | ० | ० | ७ |
| | | जामदा, ता.नवापूर | १९ | १ | ० | २ | २ | १ | ० | ० | ० | ६ |
| ८ | माडिया | ताडगांव, ता.भामरागड | ९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | मुन्नेराजाराम, ता.भामरागड | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | विसामुंडी, ता.भामरागड | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | बोटानपुट्टी ता.भामरागड | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | खुडकेले, ता.भामरागड | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | इडेपल्ली, ता.भामरागड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | कसणसूर, ता.भामरागड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | मांजा ता.अहेरी | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | गोंड | मेढा ता.धानोरा | १० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | परधान | हेट्टी ता. धानोरा | ९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | तुकुंम ता.धानोरा | १३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | कोरकू | बोड ता.धारणी | ५१ | ० | ० | १ | १ | ० | १ | १ | ० | ४ |
| | | एकूण | २७२ | २१ | ६ | १५ | २१ | १५ | ५ | ९ | ० | ९२ |

पाहणीमध्ये ज्या गावांना भेटी दिल्या त्या गावात इयत्ता ४ थी पर्यंत प्राथमिक शाळेची सोय आहे व ज्या गावांपासून माध्यमिक शाळा ५ कि.मी. अंतरापेक्षा जास्त आहे अशा गावातील मुलींनी प्राथमिक स्तरावरच इयत्ता ४ थी मध्ये शाळा सोडलेली आहे. उदा.उकलापाणी ता.नवापूर जि.नंदूरबार या गावातील मावची जमातीमधील ६ ते १४ वयोगटातील ११ मुलींपैकी इयत्ता ४ थी मध्ये ३ व इयत्ता ७ वी मध्ये ४ अशा एकूा ७ मुलींनी शाळा सोडली आहे. याउलट बोरझर या गावापासून माध्यमिक शाळेची सुविधा ही २ ते ३ कि.मी. वर असल्याने तेथील मावची जमातीमधील ७ मुलींपैकी कोणीही शाळा सोडलेली नाही.

तसेच पाचघर ता.वाडा, जि.ठाणे या वनगांवापासून माध्यमिक शाळेची सुविधा ८ कि.मी. वर असल्या कारणाने तेथील वारली जमातीमधील २३ मुलींपैकी १५ मुलींनी प्राथमिक स्तरावर शाळा

सोडलेली आहे. तर ताडगांव ता.भामरागड जि.गडचिरोली येथे पोस्ट बेसिक आश्रमशाळा असल्याने माडिया जमातीमधील ९ मुलींपैकी एकही गळती नाही. तसेच मुन्नेराजाराम ता.भामरागड येथे माध्यमिक शाळा असल्याने माडिया जमातीमधील पाहणी केलेल्या कुटुंबातील ५ मुलींपैकी एकाही मुलीने शाहा सोडलेली नाही. यावरुन

**प्राथमिक शाळेच्या स्तरावरील गळतीची कारणे**

अनुसूचित जमातीमधील ६ ते १४ वर्ष या वयोगटातील मुलींची प्राथमिक शाळेच्या स्तरावरील गळतीचे पमाण फार असते, पाहणी केलेल्या एकूण २६७ कुटुंबातील एकूण ९२ मुलींनी खाली नमूद केलेल्या विविध कारणाने शाळा सोडलेली आहे.

**तक्ता क्र.८**

| अ. क्र. | अनुसूचित जमातीचे नांव | घरकाम व घर सांभाळणे | लहान मुलांचा सांभाळ करणे | आर्थिक उत्पन्न कमी | गावापासून शाळा लांब | स्थलांतर | लिंग भेद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मावची | १ | ० | १ | ५ | ० | ० | ७ |
| २. | ठाकर | २ | १ | ७ | ३ | १ | ० | १४ |
| ३. | वारली | ४ | १ | २ | ८ | ० | ० | १५ |
| ४. | कातकरी | ४ | ४ | ९ | १ | ४ | ० | २२ |
| ५. | मल्हार कोळी | २ | २ | ० | ४ | ० | ० | ८ |
| ६. | कोकणा | १ | ० | १ | ३ | ४ | ० | ९ |
| ७. | भिल्ल | ३ | ० | २ | १ | ३ | ४ | १३ |
| ८. | माडिया गोंड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९. | गोंड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १०. | परधान | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | कोरकू | ० | ० | ० | २ | २ | ० | ४ |
| | एकूण | १७ | ८ | २२ | २७ | १४ | ४ | ९२ |

पाहणीमध्ये शाळा सोडण्याची प्रमुख दोन कारणे निदर्शास आली (१)आर्थिक व (२)भौगोलिक (गावापासून माध्यमिक शाळा लांब असल्याने) एकूण ९२ मुलीपैकी आर्थिक कारणाने शाळा सोडणाऱ्या मुलींचे प्रमाण २४% आहे. शाळा लांब असल्याने शाळा सोडणाऱ्या मुलींचे प्रमाण २७% आहे. लिंगभेदामुळे मुलींना शाळा न शिकविण्याचे प्रमाण अल्प आहे. घरकाम व घर सांभाळणे या कारणासाठी शाळा सोडण्याचे प्रमाण २९% असले तरी हे कारण संयुक्तीक वाटत नाही. कारण आर्थिक कारणाने किंवा शाळा लांब असल्या कारणाने शाळा सोडलेल्या मुली हया घरकाम व घर सांभाळण्याची कामे करतात.

पाहणीमध्ये एकूण ११ लोकप्रतिनिधीकडून प्रश्नावली भरुन घेतली त्यामधून शाळा सोडण्याची कारणे खालीलप्रमाणे नमूद केलेली आहेत.

(१) गावापासून शाळा लांब असल्याने मुली शारिरिक सुरक्षेच्या दृष्टीने शाळा सोडतात.

(२) गरिबी.

पाहणीमध्ये विभागनिहाय प्रत्येक एक याप्रमाणे एकूण ७ शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रश्नावली भरुन घेतली असता त्यामध्ये शाळा सोडल्याचे मुख्य कारण लहान मुलांना सांभाळणे व आईवडिलांचे अज्ञान हे आहे. तसेच गावात माध्यमिक शाळा नसल्याने विद्यार्थी शाळा सोडतात.

## पाहणी केलेल्या गावामधील शैक्षणिक सुविधा

पाहणीमध्ये ज्या गावांना भेटी दिल्या त्या गावांमध्ये असलेल्या शैक्षणिक सुविधा व गावात शाळा नसल्यास गावापासून शाळेचे अंतर याबाबत माहिती खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नांव | शाळेची सुविधा | | गावात शाळा नसल्यास जवळची शाळा व अंतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्राथमिक | माध्यमिक | शाळा | अंतर |
| १ | नंदूरबार | नवापूर | उकळापाणी | १ | - | (१) रायपूर | ५ किमी |
| | | | | | | (२) मा.शा.रंगावलीडॅम | ४ किमी |
| २ | नंदूरबार | नवापूर | बोरझर | १ | - | (१) मा.शा.रंगावलीडॅम | २.५ किमी |
| | | | | | | (२) मा.शा.वडकळंबी | ३ किमी |
| ३ | नंदूरबार | नवापूर | दुधवे | १ | - | (१) मा.शा.भिलबारा | २ किमी |
| ४ | नंदूरबार | नवापूर | जामदा | १ | - | (१) मा.शा.अंजनी | ३ किमी |
| ५ | ठाणे | शहापूर | वडाचापाडा | १ | - | (१) मा.शा.दहिगांव | २ किमी |
| | | | | | | (२) मा.शा.खरडी | ४ किमी |
| ६ | ठाणे | शहापूर | पळसिंबा | १ | १ | सर्व सोयी उपलब्ध आहेत | |
| ७ | ठाणे | जव्हार | पाचघर | १ | - | (१)मा.शा.उपदा ७वीपर्यंत) | ८ किमी |
| | | | | | | (२) मा.शा.परळी | १२ किमी |
| ८ | ठाणे | वाडा | परळी | १ | १ | सर्व सोयी उपलब्ध आहेत | |
| ९ | ठाणे | शहापूर | खरडी | १ | १ | सर्व सोयी उपलब्ध आहेत | |
| १० | ठाणे | मोखाडा | पेरोरा | १ | १ | सर्व सोयी उपलब्ध आहेत | |
| ११ | ठाणे | वाडा | पालघर | १ | - | मा.शा.परळी | १२ किमी |
| १२ | ठाणे | विक्रमगड | वेहळयात | - | - | शाळेचे सोय उपलब्ध | - |

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नांव | शाळेची सुविधा | | गावात शाळा नसल्यास जवळची शाळा व अंतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्राथमिक | माध्यमिक | शाळा | अंतर |
| १३ | ठाणे | विक्रमगड | विठ्ठलपाडा | १ | - | मा.शा.दादडा | ६ किमी |
| १४ | रायगड | पेण | बोरकस | १ | - | मा.शा.पेण | ३ किमी |
| १५ | रायगड | कर्जत | नागेवाडी | १ | - | मा.शा.डोंगरपाडा | ६ किमी |
| १६ | रायगड | पेण | शिलेळवाडी | १ | - | मा.शा.हमरापूर | २ किमी |
| १७ | रायगड | पेण | तागाची वाडी | | | (१) प्रा.शा.भालवाडी | १ किमी |
| | | | | | | (२) मा.शाळा पेण | ८ किमी |
| १८ | नाशिक | सुरगाणा | हिरडपाडा | १ | - | मा.शाळा बोरगांव | १.५ किमी |
| १९ | अमरावती | धारणी | घोड | १ | - | मा.शाळा दिदमधा | २ किमी |
| २० | गडचिरोली | भामरागड | ताडगांव | १ (जिप शाळा) | १ पो.ब.आ. शाळा | - | - |
| २१ | गडचिरोली | भामरागड | मन्नेराजाराम | १ | १ | शाळेची सुविधा आहेत | |
| २२ | गडचिरोली | भामरागड | विसामुडी | १ | १ | शाळेची सुविधा आहेत | |
| २३ | गडचिरोली | भामरागड | बोटानवुळी | १ | - | म.शा.ताडगांव | १० किमी |
| २४ | गडचिरोली | भामरागड | खुडकेळी | १ | - | मा.शा.ताडगाव | १० किमी |
| २५ | गडचिरोली | भामरागड | धोंडेपाळी | १ | - | मा.शा.ताडगाव | ३ किमी |
| २६ | गडचिरोली | भामरागड | कसणसूर | १ | - | मा.शा.ताडगांव | ६ किमी |
| २७ | गडचिरोली | भामरागड | गाद्रा | १ | - | मा.शा.ताडगाव | २ किमी |
| २८ | गडचिरोली | धानोरा | मेंढा | १ | - | मा.शा.लेखा | ०.५ किमी |
| २९ | गडचिरोली | धानोरा | हिटी | १ | १ | शाळेची सुविधा आहे | |
| ३० | गडचिरोली | धानोरा | तुकूंभ | १ | - | उच्च मा.शाळा धानोरा | ७ किमी |

पाहणी केलेल्या गावामध्ये प्राथमिक शाळा उपलब्ध आहे. अपवाद फक्त तागाची वाडी. तथापि माध्यमिक शाळा फक्त ६ गावांमध्ये उपलब्ध आहे.

# प्रकरण-९

## सारांश

भारतीय जनगणना १९९१ अन्वये सर्वसाधारण लोकसंख्येमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७७% इतके आहे. या मध्ये पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ८६% व स्त्रियांचे प्रमाण ६७% इतके आहे. सर्वसाधारण लोकसंख्येच्या साक्षरतेच्या प्रमाणाच्या तुलनेत अनुसूचित जमातीमध्ये एकूण साक्षरतेचे प्रमाण ५५% इतके आहे. यात पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ६७% तर स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ४३% इतके आहे. सर्वसाधारण स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणात अनुसूचि जमातीच्या स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यामागील सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक व भौगोलिक कारणांचा शोध घेण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील एकूण ४५ अनुसूचित जमातीपैकी सहयाद्री विभागातील वारली, ठाकर/ठाकूर, कातकरी व मल्हार कोळी; सातपुडा विभागातील मावची, भिल्ल व कोकणा, आणि गोंडवण विभागातील गोंड, माडिया गोंड, परधान व कोरकू या ११ प्रमुख जमातींची निवड करण्यात आली. तसेच आदिवासी मुलींमधील ६ ते १४ वयोगटातील मुलींची सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या प्राथमिक स्तरावर एकूण संख्या ७,३४,४९७ इतकी होती.

पाहणीमध्ये एकूण २६७ कुटुंबाकडून कुटुंबपत्रके भरुन घेण्यात आली. या कुटुंबात एकूण ३३७ असून यापैकी २१ मुली शाळेत प्रवेश न घेतलेल्या आहेत. तसेच ठाकर/ठाकूर, वारली व कातकरी या अनुसूचित जमातीमधील मुली इयत्ता ८ वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या आहेत.

पाहणी केलेल्या २९ गावांमध्ये प्राथमिक शाळेपर्यंतच्या सुविधा उपलब्ध आहेत. तथापी माध्यमिक शाळांची सुविधा ६ गावांमध्ये आहे. २६७ कुटुंबापैकी दारिद्रय रेषेखालील एकूण २२९ कुटुंबे असून दारिद्रय रेषेच्यावर १५ ते २० हजारांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या फक्त १५ आहे. ११ जमातीपैकी ठाकर, कातकरी व पारधी या जमातींना शेती नसल्यामुळे कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन नाही. उत्पन्न कमी असल्याकारणाने अनुसूचित जमातीची कुटुंबे रोजगारासाठी स्थलांतरीत होत असतात.

अनुसूचित जमातीमधील मुलींची प्राथमिक स्तरावरील गळती थांबविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. उदा.(१)आश्रमशाळा, वसतिगृह व शिष्यवृत्ती इत्यादी असे असूनही पाहणी केलेल्या ६ ते १४ वयोगटातील २७८ मुलींपैकी एकूण ९२ मुलींनी शाळा सोडलेली आहे. त्यापैकी प्रमुख आर्थिक कारणाने शाळा सोडण्याचे प्रमाण २४% असून शाळा लांब असल्या कारणाने शारिरिक सुरक्षेच्या दृष्टीने शाळा सोडण्याचे प्रमाण २७% इतके आहे. त्यामुळे ज्या जमातींना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साध नाही त्यांना ५ एकर शेतीसाठी जमिन देणे आवश्यक आहे किंवा कायमस्वरुपी रोजगार दिल्याशिवाय मुलींच्या शिक्षणात प्रगती होणार नाही. त्याचप्रमाणे मुलींच्या शिक्षणाची प्रगती होण्यासाठी गावात किंवा गावापासून १ ते २ किमी च्या परिसरात माध्यमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. तसेच मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने स्वतंत्र शाळा सुरु करणे आवश्यक आहे.

## प्रकरण - १०

## निष्कर्ष आणि शिफारशी

१. राष्ट्राचा व समाजाचा सर्वांगीण विकास हा लोकांच्या शैक्षणिक विकासावर अवलंबून असतो. त्यामुळेच केंद्र शासन सर्व शिक्षण अभियान हा कार्यक्रम राबवित आहे. यात ६ ते १४ वर्षे या वयोगटातील मुलामुलींच्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण व १०० %. पट नोंदणी हे उदिदष्ट आहे हा कार्य क्रम राज्यशासनामार्फत राबविण्यांत येत आहे. महाराष्ट्रात सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात ग्रामीण भागात जिल्हा परीषदेमार्फत राबविण्यांत येत असलेल्या प्राथमिक शाळेची संख्या ५२,८१७ व आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या आश्रम शाळेची संख्या ५२८ व स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविण्यांत येणा-या आश्रम शाळेची संख्या ५५० इतकी असून ही सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रक्षेपित लोकसंख्ये (Projected) नुसार अनुसूचित जमातीमधील ६ ते १४ वर्ष या वयोगटातील मुलींची संख्या ८,२४,००० इतकी आहे. त्यापैकी ७,८१,९५४ मुली शिक्षण घेत आहेत. म्हणजेच ४३,००० मुली आजही शिक्षणापासून वंचित आहेत.

अनुसूचित जमातीमधील मुलीनमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यामागील सामाजिक आर्थीक , सास्कृंतिक , भौगोलीक व जैवशास्त्रीय करण्याचा शोध घेण्यासाठी केलेल्या पाहणी मध्ये पुढील बाबी निदर्शनास आल्या.

१. पाहणीमध्ये एकूण ३० गावांना भेटी दिल्या असता या सर्व गावात इयत्ता ४ थी पर्यत प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध आहे तर ६ गांवा मध्येच फक्त माध्यमिक शाळेची सुविधा उपलब्ध आहे. प्राथमिक शाळेमध्ये बहुतेक शाळा या एक शिक्षकी आहेत. त्यामुळे असे प्रस्तावित करण्यांत येते की, ज्या शाळा एक शिक्षकी आहेत. त्या शाळेत हजेरी पटाचा विचार न करता इयत्तानिहाय शिक्षकांची नियुक्ती करावी.

२. पाहणी मध्ये एकूण ११ अनुसूचित जमाती मधील एकूण २६७ कुटुंबाकडून कुटुंबपत्रके भरुन घेतली. त्यामध्ये एकूण मुलीची संख्या ३३७ आहे. त्यापैकी फक्त २१ मुली शाळेत न जाणा-या आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ६.३३ %. इतके आहे. त्यात कातकरी, माडीया,मल्हार कोळी व ठाकूर जमातीच्या मुलीची संख्या जास्त आहे. त्याचप्रमाणे कातकरी,ठाकूर, जमातीच्या मुलीची संख्या जास्त आहे. त्याचप्रमाणे कातकरी,ठाकूर,वारली व मल्हारकोळी या जमातीमधील मुली इयत्ता ४ थी व इयत्ता ५ वी पेक्षा जास्त शिकलेल्या नाहीत.

या ठिकाणी प्रस्तावित करण्यांत येते की, या जमातीच्या पालकात शिक्षणाचा प्रसार करावा तसेच यांचे प्रौढ शिक्षणाद्वारे जनजागृती करावी.

३. पाहणीमध्ये असे निदर्शनास आले की, ज्या गावात अथवा गावापासून १ ते २ कि.मी. अंतरावर माध्यमिक शाळा उपलब्ध आहे. त्या गावांतील मुले मुली या इयत्ता ७ वीच्या

पुढे शिकले आहेत . या उलट ज्या गांवात फक्त ४ थी पर्यत प्राथमिक शाळा आहे व गावापासून ३ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर माध्यमिक शाळा आहे त्या गावातील मुली इयत्ता४ थीच्या पुढे शिकल्याची संख्या जास्त नाही. त्यामुळे येथे प्रस्तावित करण्यांत येते की, गावामध्ये किंवा गावांच्या १ ते २ कि.मी. च्या परिसरात माध्यमिक शाळेची सुविधा उपलब्ध करण्यांत यावी.

४. प्राथमिक शाळेच्या स्तरावर एकूण ९२ मुलीनी विविध कारणानी शाळा सोडली आहे. याचे प्रमुख कारण आर्थीक आहे. पाहणी केलेल्या जमातीमध्ये मावची,कोकणा,भिल्ल, माडीया व गौंड या जमातीच्या कुटुंबांना शेती असल्याने त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन आहे. याउलट कातकरी ठाकर व वारली यामध्ये भुमिहिन कुटुंबाची संख्या जास्त आहे. त्यामुळे त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे रोजगारासाठी मुलींच्या आई वडील या दोघांनाही जावे लागते व घरकामासाठी किंवा लहान मुलांना सांभाळण्यासाठी मुलींना शाळा सोडून द्यावी लागते. या ठिकाणी प्रस्तावित करण्यांत येते की, जी कुटुंबे भुमिहिन आहेत. त्यांना स्वाभिमान योजने अंतर्गत (भुदान) १ ते ५ एकर जमिन देण्यांत यावी म्हणजे त्यांना कायम स्वरुपी उत्पन्नाचे साधन प्राप्त होऊन आर्थीक परिस्थती सुधारणा होण्यांस मदत होईल.

५. घरकाम किंवा घरातील लहान मुलांना सांभाळण्यासाठी शाळा सोडून देणा-या मुलींचे शेकडा प्रमाण २९ %. इतके आहे. या ठिकाणी प्रस्तावित करण्यांत येते की, गांवात किंवा रोजगारांच्या ठिकाणी १ ते ५ वर्षापर्यतच्या मुलांनसाठी पाळणाघर योजना सुरु करावी.

६. पाहणी मध्ये असे निदर्शनास आले आहे की, कातकरी व ठाकर त्याचप्रमाणे राज्याच्या सिमेलगतच्या जमातीची कुटुंबे ही रोजगारासाठी दुस-या ठिकाणी अथवा दुस-या राज्यात स्थलांतरीत होत असतांत. त्यामुळे शाळेतील गळती जास्त असते. कातकरी व ठाकर या जमातीची कुटुंबे तर वर्षातून ८ महिने रोजगारासाठी विटभट्टयावर काम करण्यासाठी कुटंबासह स्थलांतरीत होतात व पावसाळयांत ४ महिने स्वतःच्या गावी राहतात. या ठिकाणी प्रस्तावित करण्यांत येते की, या जमातीच्या कुटुंबाना न्युक्लिअस बजेट मधून स्वंयरोजगारासाठी आर्थीक सहाय्य देण्यांत यावे. ज्या योगे ही कुटुंबे स्वतःच्या विटभट्टया सुरु करु शकतील. तसेच या जमातीच्या वस्ती जवळ बांबूची लागवड करुन बांबू पासून विविध वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण द्यावे. उदा. चटई,टोपल्या व हस्तकलेच्या विविध वस्तु व उत्पन्न होणा-या वस्तुना बाजारपेठ उपलब्ध करुन द्यावी.

७. पाहणी मध्ये असे निदर्शनास आले की. अनुसूचित जमातीमधील मुली इयत्ता ७ वीच्या पुढे जास्त शिकत नाहीत. याचे कारण सामाजिक व राजकिय व्यक्तिस विचारले असता त्यांनी मुलींची शारिरीक संरक्षण हे कारण सांगितले. तसेच प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे सुध्दा हे लक्षांत आले आहे. त्यामुळे येथे प्रस्तावित करण्यांत येते की, आदिवासी विकास विभागामार्फत सुरु कराव्यात.

८. शासन शाळेतील गळती थांबविण्यासाठी मुलींना १/- रु. उपस्थिती भत्ता देत आहे तो भत्ता फारच कमी आहे. कारण ज्या कुटुंबाला उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे ती कुटुंबे आपल्या

मुलींना या १ रुपयाोक्षा मोठया मुलींना रोजगारासाठी घेऊन जाणे पसंत करतात. त्यामुळे प्रतिदिन रु. ५/- उपस्थिती भत्ता द्यावा असे प्रस्तावित करण्यांत येते.

९. अनुसूचित जमातीच्या मुलींना अभ्यासक्रमाबरोबरच व्यावसायिक शिक्षण सुध्दा द्यावे उदा. विणकाम, संगणक हस्तकलाच्या वस्तुची निर्मिती

## परिशिष्ठ - १

### वर्षनिहाय सर्वसाधारण मुलींच्या तुलनेत अनुसूचित जमातीच्या मुलीची शिक्षणांची प्रगती

| वर्ष | | सन १९९१-९२ | | | सन १९९२-९३ | | | सन १९९३-९४ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % |
| पहिली | I | १२०५२८१ | १२७६९२ | १०.५३ | १२१६४५७ | १३५९७८ | ११.१७ | १२५१५२३ | १४३८५५ | ११.४९ |
| दुसरी | II | १०४०५४० | ९६४५२ | ९.२६ | १०७२०९० | १०१३२१ | ९.४५ | ११००६२८ | १०८३०१ | ९.८३ |
| तिसरी | III | १००९५२८ | ८६९५८ | ८.६१ | १०३११६१ | ८९२७५ | ८.६५ | १०६२१२३ | ९४५७० | ८.९० |
| चौथी | IV | ८२२६३६ | ६०७५३ | ७.३८ | ८७७१६७ | ६६६२२ | ७.५९ | ९१७५६६ | ७१५८६ | ७.८० |
| पाचवी | V | ७३२४७१ | ४३७८५ | ५.९७ | ७६८३७० | ४६८४४ | ६.०९ | ८३५३११ | ५१२२७ | ६.१३ |
| सहावी | VI | ६३४९६७ | ३४०४१ | ५.३६ | ६६४१३६ | ३६९६० | ५.५६ | ७०४२१७ | ४०६६९ | ५.७७ |
| सातवी | VII | ५४७३५८ | २८७४८ | ५.२५ | ५८४३४९ | ३१३३१ | ५.३६ | ६१५१५५ | ३४४३४ | ५.५९ |
| आठवी | VIII | ४५५६४५ | २१४९० | ४.७१ | ४८२३६५ | २३६०४ | ४.८९ | ५०९२३६ | २५१२० | ४.९३ |
| एकूण | | ६४४८४२६ | ४९९९१९ | ७.७५ | ६६९६०९५ | ५३१९३५ | ७.९४ | ६९९५७५९ | ५६९७६२ | ८.१४ |

## परिशिष्ट - १

## वर्षनिहाय सर्वसाधारण मुलींच्या तुलनेत अनुसूचित जमातीच्या मुलीची शिक्षणांची प्रगती

| वर्ष | | सन १९९४-९५ | | | सन १९९५-९६ | | | सन १९९६-९७ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % |
| पहिली | I | १२४६७२१ | १४६४८५ | ११.७४ | १२८३७१८ | १५३२९३ | ११.९४ | १३०२२५७ | १६०१२५ | १२.२९ |
| दुसरी | II | ११२८०१० | ११७४७५ | १०.४१ | ११३९१३२ | ११८३६१ | १०.३८ | ११६३२६२ | १२६७५४ | १०.८९ |
| तिसरी | III | १०९०७०७ | १०२४७५ | ९.३९ | ११२०८९० | १०६६१२ | ९.५१ | ११३१४८४ | ११३६४७ | १०.०४ |
| चौथी | IV | ९५३७५२ | ७७१४२ | ८.०८ | ९७७१५७ | ८३७२४ | ८.५६ | १०१५०७८ | ९२६३१ | ९.१२ |
| पाचवी | V | ८६२९११२ | ५६५३७ | ६.५५ | ८८७२६७ | ६११७४ | ६.८९ | ९११२१५ | ६७०७२ | ७.३६ |
| सहावी | VI | ७५४४८६ | ४६८१२ | ६.२० | ७७८११७ | ४९६१४ | ६.३७ | ८१७९४८ | ५४२०५ | ६.६२ |
| सातवी | VII | ६५०६७९ | ३७५८५ | ५.७७ | ७०३०९७ | ४२३६६ | ६.०२ | ७३१२७५ | ४५६२१ | ६.२३ |
| आठवी | VIII | ५४२७५७ | २७५११ | ५.०७ | ५६६६८३ | २८७७१ | ५.०७ | ६०८०७० | ३०२०८ | ४.९६ |
| एकूण | | ७२३००२४ | ६१२०२८ | ८.४६ | ७४५७६६१ | ६४३९१५ | ८.६३ | ७६८०५८९ | ६९०२७१ | ८.९८ |

## परिशिष्ठ - १

### वर्षनिहाय सर्वसाधारण मुलींच्या तुलनेत अनुसूचित जमातीच्या मुलीची शिक्षणांची प्रगती

| वर्ष | | सन १९९७-९८ | | | सन १९९८-९९ | | | सन १९९९-२००० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % |
| पहिली | I | १२४६१५० | १५०९४७ | १२.११ | १२०६६२८ | १४५५१२ | १२.०४ | ११५४८३७ | १४३१५४ | १२.३९ |
| दुसरी | II | १२०२०४० | १३४४९९ | ११.१८ | ११६२४३७ | १२७८०६ | १०.९९ | १०९३७३८ | १२५७०८ | ११.४९ |
| तिसरी | III | ११७२८३९ | १२०७६५ | १०.२९ | १२२३९७९ | १२८४०९ | १०.४९ | १११११७०९ | १२१६७४ | १०.९४ |
| चौथी | IV | १०५३६५३ | ९५५४१ | ९.०६ | १०९२०३५ | १००१४० | ९.१७ | ११४५७०९ | ११५८९२ | १०.११ |
| पाचवी | V | ९५९११३ | ७५११३ | ७.८३ | १००२३७४ | ७६०२३ | ७.५८ | १०६०३१८ | ८५०२९ | ८.०१ |
| सहावी | VI | ८४९४६६ | ६०४३६ | ७.११ | ८९५००० | ६६४४० | ७.४२ | ९२११३५ | ७०२५१ | ७.६२ |
| सातवी | VII | ७८२१६७ | ५०६७२ | ६.४७ | ८०२०४४ | ५५००८ | ६.८५ | ८२६७१७ | ५८८१६ | ७.११ |
| आठवी | VIII | ६५११२७ | ३६६९६ | ५.५६ | ६८८१६५ | ३९४१५ | ५.७२ | ७०८६१७ | ४२५१८ | ५.९९ |
| एकूण | | ७९१४६३५ | ७२४७४९ | ९.१४ | ८०७२६६२ | ७३८५५३ | ९.१४ | ८०२२८६० | ७६३०४२ | ९.५१ |

## परिशिष्ठ - १

### वर्षनिहाय सर्वसाधारण मुलींच्या तुलनेत अनुसूचित जमातीच्या मुलीची शिक्षणांची प्रगती

| वर्ष | | सन २०००-०१ | | | सन २००१-०२ | | | सन २००२-०३ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % | सर्व. मुली | अनु. ज.मुली | % |
| पहिली | I | ११२३२८६ | १४०३११ | १२.४९ | | | | | | |
| दुसरी | II | १०७६८१९ | १२७८२२ | ११.८७ | | | | | | |
| तिसरी | III | १०७८७२१ | ११९६३३ | ११.०९ | | | | | | |
| चौथी | IV | १०६२१०५ | १११९३६ | १०.५३ | | | | | | |
| पाचवी | V | १११६६४५ | ९५६०३ | ८.५६ | | | | | | |
| सहावी | VI | १००४६४५ | ७७७९५ | ७.७४ | | | | | | |
| सातवी | VII | ८६२२५४ | ६१३९७ | ७.१२ | | | | | | |
| आठवी | VII | ७३८५९७ | ४७४५७ | ६.४२ | | | | | | |
| एकूण | | ८०६३०७० | ७८११५४ | ९.६९ | | | | | | |

# संशोधन संघ

**श्री. वाय.पी.एस.तोमर**

भा.प्र.से.

आयुक्त.

**श्री.व्ही.बी.कांबळे,**

संशोधन अधिकारी

**श्री. व्ही.एन. डगळे,**

वरिष्ठ अन्वेषक

**श्रीमती रेखा भा. अहिरे,**

कनिष्ठ अन्वेषक

**श्री. किरण पां.कुर्डे,**

लघुटंकलेखक

मुद्रण स्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.